BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024

# लोकसभा निवडणुकीबाबत पाटण शहरात जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मतदारात मतदानाची जनजागृती करण्यासाठी पाटण येथील बी. डी. कॉलेजच्या पटांगणावर शनिवारी तालुका प्रशासनाकडून भारताचा नकाशा साकारण्यात आला. यात तब्बल एक हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

या मतदान जागृती कार्यक्रमात जिल्हा स्वीप नोडल अधिकारी याशनी नागराजन, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सुनील गाढे, तहसीलदार अनंत गुरव, गटविकास अधिकारी गोरख शेलार, प्राचार्य शिरीषकुमार पवार, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, नगरपंचायतीचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, पाटण रोटरी क्लब, महिला बचत गटातील सदस्य, शहरातील आणि परिसरातील मतदार या उपक्रमात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मतदार जागृतीचा संदेश देणारे फुगे सोडून केले. तहसीलदार अनंत गुरव यांनी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन मतदानाचा अधिकार बजावावा, असे आवाहन केले.

रेखा कसबे, दिव्यांका कसबे यांनी मतदार गीत सादर केले. बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण येथील विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो हे पथनाट्य सादर केले. अरुंधती गरुड यांनी प्रास्तविक केले. नितीन घाडगे यांनी आभार मानले.